# जलसंपदा

## १. सीआर/३८५/जळगांव/१४

सन २०११—१२ या वर्षात निंभोरा व धार ता.धरणगांव, जिल्हा जळगांव येथील साठवण बंधारे सिंचन विभागा कडुन दोन बंधारे मंजूर झाले होते. सदर साठवण बंधाऱ्याचे कामे फिर्यादी हे करत होते. सन २०१२—१३ मध्ये सदर बंधाऱ्याची कामे पुर्ण झाल्यानंतर फिर्यादी यांनी दोन्ही बंधाऱ्याची सुमारे रु.१८,००,०००/— ची बिले तयार करुन ती लघुसिंचन विभाग जलसंधारण,जळगाव येथे जमा केलेली आहेत. त्यापैकी रु.१२,००,०००/— बिल मंजूर झाले. उर्वरित बिलाची रक्कम मंजूर करुन चेक देण्यासाठी आरोपी लोकसेवक सुरेश एकनाथ शिंपी, उपविभागीय अधिकारी, वर्ग—१, लघुसिंचन(जलसंधारण विभाग), उपविभाग, जळगांव यांनी तक्रारदार यांचेकडे दिनांक १३/०५/२०१४ रोजी पंचसाक्षीदारासमक्ष रु.११,०००/— लाचेची मागणी करुन स्वीकारली.

सदरबाबत जळगांव शहर पोलीस ठाणे जि.जळगांव गुरनं. ३०१२ / २०१४ कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.